This Question paper shared by Ajit from Ahmednagar District. Thanks Ajit.

...Patil Jr. College Karjat

Preliminary Exam – 2021-22

Sub – Marathi Std - XII Ghalme Ajit (24) Marks -80

| विभाग १ : गद्य | २० गुण |
|---|---|

पठित गद्य

कृती १. (अ) पुढील गद्य-उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :

१. (आकलन कृती)

- पुढील वाक्यांचा अर्थ सोदाहरण स्पष्ट करा : २

(१) यथाप्रमाण गती ही गरज आहे; पण अप्रमाण, अवास्तव आणि अनावश्यक गती ही एक विकृती आहे.

(२) जीवन हे दशदिशांना विभागले आहे.

वेग हे गतीचे एक रूप आहे. आपले जीवनही स्थिती आणि गती यांत विभागलेले आहे. थांबणे, चालणे, धावणे असे हे जीवनचक्र फिरतच असते. आपल्या विचारांनाही गती असते, जिला आपण प्रगती म्हणतो. ती विचारांची गती असते. गतीला जेव्हा दिशा असते तेव्हाच ती प्रगती या संज्ञेला पात्र ठरते. दिशाविहीन गती ही अधोगती ठरते. आपल्या जीवनात विलक्षण वेगवानता आढळते. रस्ते वाहनांनी व्यापलेले असतात. माणसे घरांत राहतात म्हणूनच अल्पकाळ तरी स्थिर राहतात. एरवी गतीपायी अगतिक होतात.

अहोरात्र भरारणारी आणि थरारणारी वाहने पाहिली म्हणजे आश्चर्य वाटते. ही आली कोठून? आली कशी आणि कशासाठी? पूर्वी देशोदेशींचा इतिहास घडला. लोकांनी जगप्रवासही केला; पण आजच्याएवढी अवखळ वाहने कोठे दिसत नसत.

आता माणूस घरातून दारात आला, की वाहनावर आरूढ होतो. वेळ थोडा असतो. कामे बरीच असतात. पायी चालत ती उरकता येत नाहीत. जीवन हे दशदिशांना विभागलेले आहे. मुलांची शाळा एका टोकाला, आपले कार्यालय दुसऱ्या टोकाला, मंडई एका बाजूला तर दवाखाना दूर, कुठल्या तरी दिशेला. जीवनाची ही टोके सांधणार कशी? जोडणार कशी? शेवटी गती ही घ्यावीच लागते. यथाप्रमाण गती ही गरज आहे; पण अप्रमाण, अवास्तव आणि अनावश्यक गती ही एक विकृती आहे. आपली कामे यथासांग पार पाडावीत, एवढा वेग जीवनाला असावा. त्यापेक्षा अधिक वेग म्हणजे अक्षम्य आवेग म्हणावा लागेल. तो आत्मघातकी ठरतो.

२. (आकलन कृती)

- चौकटी पूर्ण करा : २

(१) जीवनाला विभागणारे घटक → [ ] [ ]

Contact us: @SahajAdhyayan Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsA

(२) विचारांची गती म्हणजे → [ ]

(३) अधोगती म्हणजे → [ ]

३. **(स्वमत किंवा अभिव्यक्ती कृती)**

- 'वाहन हे वेळ वाचवण्यासाठी असते, ते वेळ घालवण्यासाठी नसते,' हे विधान तुमच्या शब्दांत स्पष्ट करा. ४

**किंवा**

- 'वाहनांच्या अतिवापरामुळे शरीरव्यापारात अडथळे निर्माण होतात,' तुमचे मत लिहा.

**कृती १. (आ) पुढील गद्य-उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

१. **(आकलन कृती)** १

(१) **चौकटी पूर्ण करा :**

(१) पंचमहाभूतांनी बनलेला → [ ]

(२) लेखकांच्या मते सहावे महाभूत → [ ]

(२) **एका वाक्यात लिहा :** १

'दाती तृण धरणे' या वाक्प्रचाराचा अर्थ → --------

मानवी देह पंचमहाभूतांचा बनलेला आहे असे म्हणतात. ज्या ज्ञानी मंडळींना मानवी देहात पंचमहाभूते दिसली, त्यांना सहावे महाभूत कसे दिसले नाही याचे मला राहून-राहून नवल वाटते. या सहाव्या महाभूताला सामान्यांच्या भाषेत 'दात' असे म्हणतात.

माझ्या मते, दात ही परमेश्वराने मारून ठेवलेली मेख आहे. मानवी देहाची सर्व रचना परिपूर्ण केल्यानंतर जवळजवळ सहा-सात महिन्यांनी ही दाताची कल्पना परमेश्वराला सुचली असावी. नाही तर इतर सर्व अवयव एकदम फुटत असताना दातच तेवढे एखाद्या सभेच्या मुख्य पाहुण्यासारखे मागाहून का यावेत ?

तुटलेले बोट पुन्हा उगवल्याचे माझ्या तरी पाहण्यात नाही किंवा पहिले नकटे नाक गळून पडून त्या जागी नवे नाक आल्याचेही ऐकिवात नाही; पण दात हा एकच अवयव असा आहे, की जो दोनदोनदा उगवतो. तेव्हा माणसाला शरण आणताना तृण धरायला एखादी चांगली जागा असावी म्हणून ही दातांची योजना झाली आहे याबद्दल माझी तरी खात्री आहे. तसे दातांनी माणसाला काय दिले आहे ? दुसरा कुठलाही अवयव उगवताना माणसाला त्रास होत नाही. पण दात हे त्रास दिल्याशिवाय उगवतच नाहीत. ते येताना ताप आणि गेल्यावर पश्चात्ताप !

२. **(आकलन कृती)** १

(१) **कृती करा :**

दात → येताना → [ ]

दात → जाताना → [ ]

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.    Contact us: @SahajAdhyayan
8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp...

(२) **विधान पूर्ण करा :** १

लेखकाच्या मते, दात ही ............

३. **(स्वमत किंवा अभिव्यक्ती कृती)**

(१) लेखकाने दुखऱ्या दाताची तुलना अक्राळविक्राळ राक्षसाशी केलेली आहे, याबाबत तुमचे मत लिहा. ४

***किंवा***

(२) प्रस्तुत पाठ तुम्हांला आवडण्याची वा न आवडण्याची कारणे लिहा.

## अपठित गद्य


**कृती १. (इ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

१. **(आकलन कृती)**

(१) **कृती करा :** १

कथाप्रकाराचे नाव – [ ]

(२) **तुलना करा :** १




एका दृश्याने लक्ष वेधून घेतलं, गाडी मध्येच थांबली होती. आकाशाला भिडणारे हिरवेगार डोंगर होते. त्या डोंगरांलगत काळे, पांढरे ढग इतस्ततः वावरत होते. विरल कापुसलेले पांढरे ढग वरवर जात होते. जलद असे काळेसावळे ढग खाली येत होते. मधूनच त्यांची टक्कर होत होती.

त्या ढगांकडे अनिमिष नेत्रांनी पाहता पाहता कधी तरी वाचलेल्या वि. स. खांडेकरांच्या रूपककथेची आठवण झाली.

पांढरे ढग वर वर जात होते. काळे ढग खाली खाली धरित्रीकडे येत होते. पांढऱ्या ढगांनी तुच्छतेने त्या काळ्या ढगांकडे पाहिले. आमचे स्थान पाहा किती उच्च, असा गर्वोक्त अभिप्राय त्या नजरेत होता. काळे ढग त्यांना सांगत होते, 'आम्ही सृष्टीवर बरसण्यासाठी खाली खाली जात आहोत. आम्हांला पृथ्वीवरील माणसांना पाणी द्यायचे आहे, पृथ्वीचे सस्यश्यामलतेचं स्वप्न साकार करायचं आहे. जीवन फुलवायचं आहे. आमचा वर्ण काळा असला तरी अंतरंग दयावंत आहे. दुसऱ्यासाठी जगतात ते खऱ्या अर्थाने जगतात. आम्ही खाली जात असलो, तरी आमच्या जीवनाची त्यातच सार्थकता आहे. तेच उच्च स्थान आहे.'

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan
8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... H

This Question paper shared by Ajit from Ahmednagar District. Thanks Ajit.

Contact us: @SahajAdhyayan

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.

२. (आकलन कृती)

- **चौकटी पूर्ण करा :** २

(१) काळ्या ढगांच्या अंतरंगाचा गुण → ☐

(२) या लेखकांच्या रूपककथेची आठवण → ☐

(३) पांढऱ्या ढगाला दिलेली विशेषणे → ☐ व ☐

| **विभाग २ : पद्य** | **१६ गुण** |
|---|---|

**कृती २. (अ) पुढील कवितेच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

१. (आकलन कृती)

- **कृती करा :** २

आरशातील स्त्रीने आरशाबाहेरील स्त्रीला अधिकारवाणीने केलेला उपदेश → ..................
→ ..................

सहज आरशात पाहिले नि डोळे भरून आले
आरशातील स्त्रीने मला विचारले, 'तूच ना ग ती!
माझेच रूप ल्यालेली, तरीही मी नसलेली
किती बदललीस ग तू अंतर्बाह्य...!
तुला सांगू तुझ्या अंतरीचे सुंदर पूर्वरंग
ऐक हं...! तू कशी होतीस ते!

पावसाचे तरंग ओंजळीत भरणारी चैतन्यमयी बालिका
अंगणात दिवे लावावेत तसे सर्वच बहर लावणारी तू नवयौवना
स्वप्नांचे पंख लावून आभाळ झुल्यावर झुलणारी तू ध्येयगंधा
नि आज नखशिखांत तू... तू आहेस फक्त स्थितप्रज्ञा राणी!

आरशात भेटलीस तरी बोलत नाहीस ग मन उलगडून
ओठ मात्र असतात पिळवटलेले, खसकन देठ तोडलेल्या फुलांसारखे,
इतकी कशी वेढून गेलीस या घनगर्द संसारात
जळतेस मात्र अहोरात्र पारंपरिकतेचे वरदान समजून

अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला
दार उघडून आत घेण्याचेही भान नाही ग तुला
बागेतली ती अल्लड जाईही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून
पण तू, तू मात्र झालीस अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी

अनेकदा तुला मी अशी पाहते की काळीजच हंबरते
रात्रीच्या एकांतात तर हुंदका कंठात दाबून
शिवत असतेस तुझे तिक[illegible] [illegible]णी [illegible]

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on Whats

नि पदराखाली झाकतेस देहामधल्या असह्य कळा
तिचे हे बोलणे ऐकताच मी स्वत:च हिंदकळतेय
आणि अशातच, ती मला गोंजारीत, जवळ घेत
अधिकारवाणीने म्हणाली –

'रडू नकोस खुळे, उठ! आणि डोळ्यातले हे आसू
सोडून दे शेजारच्या तळ्यात
नि घेऊन ये हातात
नुकतीच उमललेली शुभ्र कमळाची प्रसन्न फुले'

२. (आकलन कृती)

- **पुढील शब्दसमूहांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा :** २

(१) प्रेयस चांदणे → ----------------

(२) प्राण हरवलेली पुतळी → ---------------

३. (अभिव्यक्ती कृती)

- 'आरशातील स्त्रीने आरशाबाहेरील स्त्रीशी केलेला संवाद हा स्वत:शीच केलेला सार्थ संवाद आहे.' हे विधान स्पष्ट करा. ४

**कृती २. (आ) पुढील ओळींचा अर्थ लिहा :** ४

ह्या विंचवाला उतारा। तमोगुण मागें सारा।
सत्त्वगुण लावा अंगारा। विंचू इंगळी उतरे झरझरां।

**कृती २. (इ) (काव्यसौंदर्य/रसग्रहण)** ४

माणसांच्या मध्यरात्रीं हिंडणारा सूर्य मी :
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा !

**या ओळींतील भावसौंदर्य स्पष्ट करा.**

*किंवा*

- **पुढील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा :**

समुद्र कोंडून पडलाय गगनचुंबी इमारतींच्या गजांआड.
तो संत्रस्त वाटतो संध्याकाळीं : पिंजारलेली दाढी, झिंज्या.
हताशपणे पाहत असतो समोरच्या बत्तिसाव्या मजल्यावरील मुलाकडे,
ज्याचं बालपण उंचच उंच पण अरुंद झालंय
आणि त्याची त्याला कल्पनाच नाही.
समुद्राच्या डोळ्यांत थकव्याचं आभाळ उतरत येतं
आणि शिणून तो वळवतो डोळे.
इमारतींच्या पलीकडच्या रस्त्यावर थकलेल्या माणसांचे पाय, बसची चाकं

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan
8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... H

This Question paper shared by Ajit from Ahmednagar District. Thanks Ajit.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.     Contact us: @SahajAdhyayan

| विभाग ३ : साहित्यप्रकार (कथा) | १० गुण |
|---|---|

कृती ३. (अ) (कथा : साहित्यप्रकार–परिचय; सैद्धांतिक–पठित उतारा)

• पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :

१. (आकलन कृती)

(य) विधान पूर्ण करा : १

कथेचे अभिवाचन एकाच वेळी जर अनेकांकडून केले गेले, तर -------

**कथेचे सादरीकरण**

कथेचे 'सादरीकरण' ही एक कला आहे आणि योग्य प्रयत्नाने ही कला साध्य होऊ शकते. विविध प्रकारच्या कथांचे मूकवाचन, प्रकट वाचन करण्याचा सराव, विविध कथा लेखकांची/लेखिकांची लेखनशैली समजून घ्यायचा केलेला प्रयत्न, भाषेची जाण, शब्दोच्चार आणि सादरीकरण कौशल्ये यांमुळे कथाकथनाचे तंत्र अवगत होऊ शकते.

अलीकडच्या काळात 'कथाकथन' क्षेत्रात अनेक व्यावसायिक संधी उपलब्ध होत आहेत. कथा-अभिवाचनाचे कार्यक्रम विविध निमित्ताने रंगमंचावरून सादर केले जात आहेत. आकाशवाणी, दूरदर्शन या लोकप्रिय माध्यमांतून सादर केले जाणारे 'कथाकथन' अधिकाधिक लोकांना आकर्षित करत आहे. या पार्श्वभूमीवर कथा-सादरीकरण हा पैलू लक्षणीय ठरतो.

**अभिवाचन**

अभिवाचनामुळे कथा श्रोत्यांपर्यंत योग्यप्रकारे पोहोचण्यास मदत होते. कथेचे अभिवाचन एकाच वेळी जर अनेकांकडून केले गेले तर आवाजाचा एकसुरीपणा टळतो. संवादातील चढउतार, चटपटीतपणा, शब्दफेक यांतील विविधतेचा आनंद श्रोत्यांना मिळतो. कथेतील घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा यांचे आकलन होण्यास मदत होते. कथावाचनाला जर पार्श्वसंगीताची, प्रकाशयोजनेची, नेपथ्याची जोड दिली तर ते अभिवाचन श्रोत्यांवर चांगला परिणाम करते व दीर्घकाळ स्मरणात राहते.

**कथाकथन**

कथाकथन करणाऱ्या व्यक्तीला भाषेच्या ज्ञानाबरोबरच वाचिक अभिनयाचीही थोडी जोड द्यावी लागते, त्यामुळे कथाकथन उठावदार होते. कथाकथन करणाऱ्याला शब्दांच्या माध्यमांतून पात्रांना जिवंत करायचे असते. कथाकथन करणाऱ्या व्यक्तीला कथा सादर करायची असल्याने कोणताही लिखित मजकूर हातात नसतो. श्रोत्यांशी संवाद साधत, त्यांचा प्रतिसाद घेत, लेखकाच्या मूळ संहितेला धक्का न लावता; पण परिणामकारकरीत्या ती श्रोत्यांपर्यंत पोहोचवायची असते.

कथेची निवड करणे फार महत्त्वाचे व तितकेच जबाबदारीचे काम असते. कथा सादरीकरणाचा कालावधी व श्रोत्यांचा अवधान काळ यांचे भान कथा सादरीकरणात ठेवावे लागते. कथा ही संवादातून खुलत असल्याने शब्दफेक, प्रभावी उच्चारण, स्पष्टता आणि शब्दांचा गर्भितार्थ श्रोत्यांपर्यंत

पोहोचवणे हे त्या वेळी कौशल्यपूर्ण आणि ... असते.

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsA

(२) कृती करा :

कथेच्या सादरीकरणाचे दोन प्रकार → [ ] → [ ]

२. (आकलन कृती)

'कथेचे सादरीकरण' याविषयी थोडक्यात लिहा. २

**कृती ३. (आ) (स्वमत आणि अभिव्यक्ती कृती)**

- **पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती सोडवा :** ६

(१) अनूला समाज कसा समजून घ्यायचा आहे, ते थोडक्यात स्पष्ट करा.

(२) 'कथेतील टॅक्सी ड्रायव्हरने जीवनातील वास्तवाचा घेतलेला शोध' तुमच्या शब्दांत लिहा.

(३) 'वान नदीले कदीमदी येनारा पूर आता पटावरल्या आकळ्याइले आला होता,' यातून तुम्हांला समजणारा अर्थ स्पष्ट करा.

(४) 'गढी' या पाठाच्या शीर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.

| विभाग ४ : उपयोजित मराठी | १४ गुण |
|---|---|

**कृती ४. (अ) (आकलन कृती)**

- **पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती सोडवा :** ४

(१) 'वस्तुनिष्ठता व सुस्पष्टता' हे अहवाललेखनाचे वैशिष्ट्य स्पष्ट करा.

(२) 'अहवाललेखनाची शब्दमर्यादा' यावर टीप लिहा.

(३) 'मुलाखतीच्या प्रश्नांची निर्मिती कशी करावी' ते स्पष्ट करा.

(४) माहितीपत्रकाची गरज असणारी क्षेत्रे स्पष्ट करा.

**कृती ४. (आ) (कौशल्य कृती)**

- **पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती सोडवा :** १०

(१) वर्तमानपत्र वितरकाची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली तयार करा.

(२) कनिष्ठ महाविद्यालयाच्या शैक्षणिक सहलीचा अहवाल लिहा.

(३) तुमच्या महाविद्यालयातर्फे आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्वस्पर्धेचे माहितीपत्रक तयार करा.

(४) रेल्वेतून प्रवास करणाऱ्या महिला-समूहाची मुलाखत घ्या.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp...

| विभाग ५ : व्याकरण व लेखन | २० गुण |
|---|---|

## ती ५. (अ) (व्याकरण)

१. वाक्यरूपांतर :

- पुढील वाक्यांचे कंसांतील सूचनांप्रमाणे वाक्यरूपांतर करा : २

(१) अबब ! केवढी प्रचंड ही इमारत ! *(विधानार्थी करा.)*

(२) रांगेत चालावे. *(आज्ञार्थी करा.)*

२. समास :

- पुढील विग्रहांवरून सामासिक शब्द ओळखा : २

(१) निळा आहे कंठ ज्याचा तो → ..................

(२) केर, कचरा वगैरे → ..................

(३) महान असे राष्ट्र → ..................

(४) सप्त आहांचा समूह → ..................

३. प्रयोग :

- पुढील वाक्यांचे प्रयोग ओळखा : २

(१) सुनीलाने अंगणात एक रोप लावले. → ☐

(२) सुनीला चित्र छान काढते. → ☐

४. अलंकार :

- पुढील वाक्यातील उपमेय व उपमान ओळखा : ह्या आंब्यासारखा गोड आंबा हाच. २

उपमेय → ☐ उपमान → ☐

५. वाक्प्रचार :

- पुढीलपैकी *कोणत्याही दोन* वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा : २

(१) मनातील मळभ दूर होणे (२) चेहरा उजळणे

(३) अंगावर काटा येणे (४) आटापिटा करणे.

## कृती ५. (आ) (निबंधलेखन)

- पुढीलपैकी *कोणत्याही एका* विषयावर निबंध लिहा : १०

(१) श्रावणातील पाऊस

(२) माझी आई

(३) एका संगणकाचे मनोगत

(४) झाडे नसती तर...

(५) संदेशीकरण : एक जीवनावश्यक कौशल्य.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan
8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsA